*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४

### विशेष श्रमसंस्कार शिबिर अहवाल

---

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित "युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास" अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण जनजागृती या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन दिनांक १६ जानेवारी २०२४ रोजी दुपारी ३ वा. मु. बहिरवाडी ता. खेड जि. पुणे या ठिकाणी संपन्न झाले. या शिबिरात गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, लिंगभाव संवेदनशीलता जनजागृती, लोकशाहीतील सहभाग व जनजागृती, जलस्रोत व वृक्षरोपण, प्रधानमंत्री जनधन व विमा योजना, अन्न सुरक्षा जनजागृती, अपारंपारिक ऊर्जा स्रोत, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, महिला सबलीकरण, स्त्री-भ्रूणहत्या, ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका, आर्थिक स्वावलंबन, वाढती लोकसंख्या आणि नियंत्रण असे विविध उपक्रम राबवण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक मा. हिरामण सातकर पाटील तर अध्यक्ष म्हणून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सन्माननीय ॲड. देवेंद्रजी बुट्टेपाटील उपस्थित होते. तसेच महाविद्यालययाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, बहिरवाडी गावचे सरपंच सौ. वसुधा अंकुश राक्षे, श्री. अंकुश राक्षे, श्री. जगन्नाथ राक्षे, उपसरपंच नितेश राक्षे, उपप्राचार्य डॉ. व्हि. डी. कुलकर्णी, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे व महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व बहिरवाडी गावचे ग्रामस्थ मोठ्या संस्खेने उपस्थित होते. या उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ, प्रास्ताविक डॉ. प्रभाकर जगताप तर आभार डॉ. किर्ती नितनवरे यांनी मानले.

बुधवार दि. १७/०१/२०२४ रोजी नियमित कार्यक्रमाअंतर्गत सकाळी ०६.०० वा. व्यायाम व योगासने, ०७.०० वा. प्रार्थना, ध्वजवंदन करण्यात आले. ०७.३० ते १२.३० दरम्यान ग्रामपंचायत लगतची स्वच्छता करण्यात आली. तसेच स्त्री-भृण हत्या थांबविण्यासाठी ग्रामस्थांमध्ये पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली., त्याचबरोबर गावातील स्त्री-पुरुष प्रमाण सर्वेक्षणाच्या माध्यमातून घेण्यात आले. यात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी दिसून आली. दुपारी ०३.०० वा. श्री. अंकुश राक्षे यांनी “ ग्रामीण विकासात तरुणाची भूमिका” या विषयावर मार्गदर्शन केले. तर मा. श्रीकांत फुलसुंदर यांनी वाढती लोकसंख्या समस्या आणि नियंत्रण या विषयावर मार्गदर्शन केले. या नंतर “ग्रामविकासात युवकांची भूमिका” या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. या गटचर्चेत सर्व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. सायंकाळी ०५.०० ते ०६.०० दरम्यान शिवार फेरी व ग्रामस्थांच्या भेटी घेण्यात आल्या. नंतर शारीरिक व बौद्धिक खेळ घेण्यात आले. रात्री ०८.०० ते १०.०० दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरन करण्यात आले. यात गायन, नृत्य आणि काव्य वाचन घेण्यात आले.

गुरुवार दि. १८/०१/२०२४ रोजी नियमित कार्यक्रमाअंतर्गत सकाळी ०६.०० वा. व्यायाम, योगासने व ०७.०० वा. प्रार्थना आणि ध्वजवंदन करण्यात आले. ०७.३० ते १२.३० दरम्यान ग्रामपंचायत, मंदिर व आसपासच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच / स्त्रीभ्रूण /बालविवाह रोखण्यासाठी पथनाट्याच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. ०१.०० ते ०२.०० या कालावधीत स्वयंसेवकांचे भोजन झाले. तर दुपारी ०३.०० वा. प्रा. किशोर लांडेपाटील यांनी “छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक” या विषयावर मार्गदर्शन केले. या

कार्यक्रमानंतर ०४.०० ते ०५.०० दरम्यान “ सामाजिक माध्यमे उपयोग आणि दुरुपयोग” या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. व रात्री ०८.०० ते १०.०० वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पथनाट्य व नाटक सादरीकरन करण्यात आले.

शुक्रवार दि. १९/०१/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. व्यायाम व योगासने, ०७.०० वा. प्रार्थना, ध्वजवंदन करण्यात आले. ०८.३० ते १२.३० दरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंगणवाडी व आसपासच्या परिसराची स्वच्छता आणि खड्डे खोदण्यात आले. तसेच पथनाट्याच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली. त्यानंतर एक ते दोन या दरम्यान स्वयंसेवकांचे भोजन झाले. ०३.०० वा. सी.ए. सचिन ढेरंगे यांनी "आर्थिक साक्षरता व गुंतवणूक" या विषयावर मार्गदर्शन केले. ०४.०० ते ०५.०० या वेळेत “ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका” या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यानंतर ०८.०० ते १०.३० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

शनिवार दि. २०/०१/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. व्यायाम व योगासने, ०७.०० वा. प्रार्थना, ध्वजवंदन करण्यात आले. ०८.०० ते १२.३० बहिरवाडी गावातील ग्रामपंचायत गावठाण परिसरातील झाडे लावन्यासाठी खड्डे खोदण्यात आले. तसेच झाडांना कुंपण करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील परिसराची स्वच्छता करण्यात आली. व स्वच्छतेबाबत पथनाट्याच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली. यानंतर स्वयंसेवकानी विविध उपक्रमाची तयारी करण्यास वेळ देण्यात आला. दुपारी ०३.०० वा. डॉ. रूपाली टाकळकर यांनी “ युवा आणि आरोग्य” या विषयावर स्वयंसेवकांसोबत संवाद साधला. तर श्री. राहुल टाकळकर यांनी " यशस्वी उद्योजक होताना" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या नंतर “ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका” आणि “महाराष्ट्रातील राजकारणाची दशा आणि दिशा” या विषयावर वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. व ०८.०० ते १०.३० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमात गीत गायन स्पर्धा घेण्यात आल्या.

रविवार दि. २१/०१/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजता बहिरवाडी गावात प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीच्या माध्यमातून मतदान व वाढती लोकसंख्या आणि समस्या बाबत जनजागृती करण्यात आली. ०९.०० ते १२.३० दरम्यान श्रमदानाच्या माध्यमातून पाईपलाईन करण्याचे काम करण्यात आले. तसेच ०२.३० ते ०४.०० या वेळेत " ग्राहक संरक्षण कायदा आणि आपण" या विषयावर ज्येष्ठ संचालक प्रा. डॉ. प्रकाश चौधरी व "भावनिक बुद्धिमत्ता" या विषयावर डॉ. संजय शिंदे मार्गदर्शन केले. या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरास डॉ. श्रीकांत फुलसुंदर एनएसएस जिल्हा समन्वयक यांनी सदिच्छा भेट स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक, प्राध्यापक वर्ग व बहिरवाडी गावातील महिलांनी एकत्रित येऊन हळदी कुंकू व पारंपारिक वेशभूषा हा कार्यक्रम घेण्यात आला. ०८.०० ते १०.०० या वेळेत " ग्रामपंचायत कार्यालयासमोरील सभागृहात" सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत गायन, पोवाडा, नृत्य, वादन स्पर्धा, एकपात्री नाटक, काव्यवाचन तसेच प्रादेशिक नृत्य सादर करण्यात आले. सदरील कार्यक्रमास ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यानंतर कॅम्प फायरचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक १६/०१/२०२४ ते २२/०१/२०२४ “युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास" अंतर्गत " लोकसंख्या नियंत्रण जनजागृती" मु. बहिरवाडी येथे समारोप समारंभ दि. २२/०१/२०२४ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमांतर्गत सात दिवसात राबवलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. गावात घेतलेले विविध उपक्रम वा केलेल्या जनजागृती बाबत सरपंच वा उपसरपंच यांनी स्वयसेवाकांचे वा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्याचे आभार मानले. या समारोप प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक

मा. हिरामण अण्णा सातकर पाटील, तर सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक बाळासाहेब सांडभोर उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. कैलास पाचारणे, सरपंच सौ. वसुधाताई राक्षे, श्री जगन्नाथ शेट राक्षे, मा. सभापती श्री. अंकुश राक्षे, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक व गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उषा जाधव, प्रस्ताविक डॉ. गणेश धुमाळ तर आभार डॉ. प्रभाकर जगताप यांनी मानले.

| | |
|---|---|
| डॉ. गणेश धुमाळ<br>कार्यक्रम अधिकारी | डॉ. शिरीष पिंगळे<br>प्राचार्य |

K.T.S. P. MANDAL'S

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALYA, RAJGURUNAGAR

NATIONAL SERVICE SCHEME A.Y. 23-24

Special Camp At Bahirwadi 16/01/2024 to 22/01/2024

<table>
<tr><td>Street Play act on Voter awareness</td><td>Cleaning of area behind ZP school</td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td>Cleaning activity</td><td></td></tr>
<tr><td></td><td></td></tr>
<tr><td>Lecture by Prof. K. J. landepatil</td><td>Morning Yoga</td></tr>
<tr><td></td><td>
</td></tr>
</table>



Lecture by CA Sachin Dherange




Cleaning Activity



21/01/2024





Cultural Programme



Cultural Programme